# प्रकरण 5 वे

5·1 निष्कर्ष, अनुमान, सुचना·

5·2 पुढील संशोधनाचे विषय·

# प्र क र ण - 5 वे.

## निष्कर्ष - अनुमान सूचना

**नि ष्क र्ष :-**

" उस्मानाबाद तालुक्यातील प्रौढ शिक्षण समस्यांचा चिकित्सक अभ्यास" हा शोध प्रबंधाचा विषय आहे या विषयाचा अभ्यास अभ्यासकाने केला यातील प्रकरण 4 थे संकलित माहितीचे विशदीकरण या मधील प्रश्नावली, मुलाखत प्रश्नावली आणि निरिक्षण यांच्या आधारे उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

1) निरक्षरतेचा प्रश्न आर्थिक सामाजिक विकासाच्या प्रश्नाशी निगडित आहे. विकास कार्यक्रमाचा फायदा साक्षरांच्या आणि सुशिक्षितांच्या पदरात भरघोस पडतो आणि निरक्षर जनता दारिद्र्याच्या सीमारेषे खाली कसे बसे जीवन कंठित असते. ही परीस्थिती कायम राहिली तर जागतिक विकासाला खीळ बसेल. ते घडू नये म्हणून साक्षरता आणि विकास यांचा समन्वित कार्यक्रम निकडीने हाती घ्यावे असे अभ्यासकाला वाटते.

2) **सर्व प्रौढ शिक्षणाचे वर्ग ग्रामीण भागातील :**

प्रौढ शिक्षणाचे वर्ग ग्रामीण भागात आहेत. उस्मानाबाद तालुक्यात 1988-89 आणि 1989-90 या काळात 8 आणि 5 केंद्रे प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे कार्य करीत होती. ही 8 ही केंद्रे 100% ग्रामीण भागातील आहेत, हे निरीक्षणावरून दिसून आले.

3) **स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण कमी :-**

उस्मानाबाद तालुक्यातील 5 केंद्रावरील स्त्री - साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. कोष्टक क्रमांक 4.5:2 प्रमाणे एकूण लोकसंख्या 6922 आहे. 557 स्त्री साक्षर आहे. शेकडा प्रमाण 8.04% आहे. 1518 पुरूष साक्षर आहे. 21.93% शेकडा प्रमाण आहे. पुरूषाच्या तुलनेत स्त्री-साक्षरता प्रमाण कमी आहे. पुरूषाचे शेकडा प्रमाण स्त्रियांच्या शेकडा प्रमाणा पेक्षा 13.89% नी जास्त आहे.

4) **लहानपणी प्रौढांनी शाळेत प्रवेश घेतला नाही :-**

लहानपणी प्रौढांनी शाळेत प्रवश घेतला नाही त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे हे दिसून येते. कोष्टक क्रमांक 4.6 वरून असे दिसून येते की, पहिली इयत्ता सोडलेले प्रौढ संख्या ही 4 आहे. त्याच प्रमाणे 2 री इयत्ता सोडलेले प्रौढ संख्या 1 आहे. 95 % प्रौढांनी शाळेत नांव घातले नाही. 95% प्रौढ हे निरक्षर आहे. शाळेत नांव घातले, पण कांही कारणास्तव शाळा सोडावी लागली अशा प्रौढांचे शेकडा प्रमाण 5% आहे.

**5§ 15 ते 19 वयोगटात निरक्षरांचे वाढते प्रमाण :-**

कोष्टक क्रमांक 4·1 वरून असे दिसून येते की, प्रौढ शिक्षणामध्ये वयोमानानुसार वर्गवारी असते· निरक्षरांचे प्रमाण वर्गवारी नुसार दिसून येते· 15 ते 19 या वयोगटातील शेकडा प्रमाण 44% आहे· 20 ते 24 या वयोगटातील शेकडा प्रमाण 34% आहे· 25 ते 29 या वयोगटातील शेकडा प्रमाण 17% आहे· 30 ते 34 या वयोगटातील शेकडा प्रमाण 4% आहे· 35 वर्षापुढील शेकडा प्रमाण 1% आहे· प्रत्येक वयोगटातील प्रौढांचा अभ्यास केल्यानंतर आढळून आले की, 15 ते 19 या वयोगटात निरक्षरांचे प्रमाण 44 % आहे· 15 ते 19 या वयोगटातील प्रौढ साक्षर होणे गरजेचे आहे·

**6§ प्रौढांना दिले जाणारे साहीत्य पुरेसे दिले जाते:-**

**प्रौढ प्रश्नावली प्रश्न क्रमांक18, 19 कोष्टक क्रमांक 4·16 आणि 4·17 या मध्ये शैक्षणिक साहित्य उपयोगी** वाटते शेकडा सरासरी 98% आहे· कधी कधी उपयोगी वाटते असे म्हणणा-यांचे शेकडा सरासरी 2% आहे· शैक्षणिक साहित्य उपयोगी नाही असे म्हणणा-याचे प्रमाण शुन्य आहे· यावरून असे दिसून येते की, प्रौढ शिक्षण केंद्रावर दिले जाणारे शैक्षणिक साहित्य पुरेसे आहे व उपयुक्तही आहे·

**7§ संघटक प्रौढांना निरनिराळे विषय शिकवितात :-**

कोष्टक क्रमांक 4·2:3 या वरून असे दिसते की, प्रौढ शिक्षण केंद्रावर संघटक पुढील विषय शिकवितात· अभ्यासातून असे दिसले की, उजळणी शिकविण्याचे शेकडा प्रमाण 76% आहे· बाराखडी शिकविण्याचे शेकडा प्रमाण 72% आहे· हिशोब शिकविण्याचे शेकडा प्रमाण 80% आहे· गोष्टी, गाणी शिकविण्याचे प्रमाण 72% आहे· इतर विषय 20% आहे· सर्वाधिक प्रमाण हिशोबाचे आहे· व्यवहारिक माहिती जास्त दिली जाते, हे स्पष्ट होते·

**8§ प्रौढ शिक्षण केंद्रावर सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात :-**

कोष्टक क्रमांक 4·2:8 वरून असे दिसते की, स्वातंत्र दिन, प्रजासत्ताक दिन, पुण्यतिथी, जयंती, शिक्षक दिन, भजन / किर्तन, हळदी-कुंकू या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा समाज प्रबोधनाचे काम उत्साह पूर्ण केले जाते· प्रजास-ताक दिन सर्व केंद्रावर साजरा केला जातो· प्रजास-ताक दिन या सांस्कृतिक कार्यक्रमाचे शेकडा प्रमाण सर्वाधिक म्हणजे 96 % आहे·

**9§ सांस्कृतिक कार्यक्रमासाठी अनुदान मिळत नाही :-**

कोष्टक क्रमांक 4·2:9 मधून अभ्यासकाला असे जाणवले की, सांस्कृतिक कार्यक्रमाकडून म्हणावे असे शासन मान्य अनुदान मिळत नाही· अनुदान मिळत नाही असे म्हणणारे संघटकांचे शेकडा प्रमाण 68% नी जास्त आहे·

**10§ प्रौढ संघटकांशी आदराने वागतात :-**

कोष्टक क्रमांक 4·2:14 संघटक प्रश्नावली व्दारे, असे दिसून येते की, प्रौढ संघटकाशी आदराने वागताना दिसून येतात· प्रौढ संघटकाशी आदराने वागणा-याचे शेकडा प्रमाण 52% आहे· सहकार्याने - शेकडा प्रमाण 40% , चांगले - शेकडा प्रमाण 44%, असहकार्याने वागण्याचे प्रमाण कमी म्हणजे शेकडा प्रमाण 16% आहे·

**11) प्रौढांचे मूल्यमापन होते :-**

कोष्टक क्रमांक 4·2:9 वरून असे दिसते की, प्रौढांचे मूल्यमापन तोंडी परीक्षा, लेखी परीक्षा व प्रगती तक्ता या द्वारे केले जाते· सर्वात जास्त मूल्यमापन हे लेखी परीक्षेद्वारे केले जाते· लेखी परीक्षेचे शेकडा प्रमाण 64% आहे· तोंडी परीक्षेचे शेकडा प्रमाण 60% आहे· प्रगती तक्तेचे शेकडा प्रमाण 48% दिसून येते·

**12) संघटक शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाले नाही तर पर्यायी व्यवस्था करतात :-**

कोष्टक 4·2:18 या वरून असे दिसते की, संघटकाला साहित्य उपलब्ध झाले नाही तर तो पर्यायी व्यवस्था करतो संघटकाचे स्वतः तयार करण्याचे शेकडा 48% आहे· प्रौढांच्या मदतीने तयार करणे आणि नजीकच्या शाळेतून मागून आणणे यांचे शेकडा प्रमाण 36% आहे· संघटक स्वतः शैक्षणिक साहित्य तयार करतो·

**13) संघटकाला प्रौढ शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम उपयुक्त वाटतो :-**

4·2:27 या कोष्टकावरून असे दिसून येते की, प्रौढ शिक्षणाचा चालू कार्यक्रम उपयुक्त वाटणा-या संघटकांचे शेकडा प्रमाण 52% आहे· कांही प्रमाणात उपयुक्त वाटतो म्हणणा-याचे शेकडा प्रमाण 28% आहे· प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम उपयुक्त वाटत नाही म्हणणा-याचे शेकडा प्रमाण 20% आहे· या वरून असे म्हणता येईल की, प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम हा संघटकाला उपयुक्त वाटतो· कारण सर्वाधिक शेकडा प्रमाण 52% आहे·

**14) प्रौढ शिक्षणाचा व्यावहारिक क्षेत्रात फायदा होतो :-**

कोष्टक क्रमांक 4·2:28 नुसार असे स्पष्ट होते की, प्रौढ शिक्षणाचा व्यवहारिक क्षेत्रात खूप फायदा होतो· प्रौढ पत्र वाचण्यास व लिहिण्यास 64% शिकले· शेकडा 60% प्रौढ मुलांचे प्रगती पुस्तके पाहतात· शेकडा 68% प्रौढ शिधा पत्रिका पाहतात· शेकडा 64% प्रौढांना वजन माप समजते· शेकडा 72% प्रौढांना पैशाचा हिशोब समजतो, त्याच प्रमाणे प्रौढांना 72% प्रमाणत झाडे लावणे गरजेचे वाटते· वरील सर्व सांख्यिकी वरून असे म्हणता येईल की, प्रौढ शिक्षणाचा व्यवहारिक क्षेत्रात फायदा होतो·

**15) प्रौढ शिक्षणाधिकारी, प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षक यांनी प्रशिक्षण घेतले आहे :-**

कोष्टक क्रमांक 4·3 नुसार असे दिसून येते की, प्रौढ शिक्षण घेणा-या पर्यवेक्षकांचे शेकडा प्रमाण 90% आहे· प्रशिक्षण घेतले नांही असे शेकडा प्रमाण 10% आहे· सर्वाधिक प्रमाण प्रशिक्षण घेणा-या पर्यवेक्षकांचे आहे· यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रौढ शिक्षणाधिकारी, प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षक यांनी प्रशिक्षण घेतले आहे·

**16) प्रौढांना प्रौढ वर्गासाठी विविध कारणांमुळे हजर राहता येत नाही :-**

कोष्टक क्रमांक 4·3:13 वरुन असे दिसून येते की, आर्थिक अडचणीचे शेकडा प्रमाण 80% आहे· त्यामुळे प्रौढ वर्गाला हजर राहू शकत नाही· प्रौढांना वर्गात समजत नाही· याचे शेकडा प्रमाण 10% आहे· कामामुळे किंवा इतर गोष्टी मुळे वेळच मिळत नाही, अशांचे शेकडा प्रमाण 40% आहे· प्रौढ वर्गाला हजर नसतात त्याचे प्रभावी कारण म्हणजे प्रौढांचा आळशीपणा होय· कारण याचे शेकडा प्रमाण 80% आहे· वर्गाची अयोग्य वेळ असल्यामुळे प्रौढ वर्गाला हजर न राहण्याचे शेकडा प्रमाण 20% आहे· वरील विविध कारणामुळे प्रौढ वर्गात हजर राहत नाही हे दिसून आले·

**17) प्रौढ शिक्षण केंद्रावर साहित्य वाटप बाबत गैरव्यवहार होत नाही:-**

कोष्टक क्रमांक 4·3:14 वरुन असे दिसून येते की, साहित्य वाटपामध्ये गैरव्यवहार होत नाही· साहित्य निर्मिती मध्ये 20% गैरव्यवहार होतो· प्रौढांच्या उपस्थीतीमध्ये 70% गैरव्यवहार होतो· गैरव्यवहार होत नाही असे म्हणणा-या संघटकाचे शेकडा प्रमाण 30% आहे·

**18) प्रौढ शिक्षण केंद्रासाठी ग्रामपंचायत कार्यालयाचा वापर होतो :-**

कोष्टक क्रमांक 4·3:16 द्वारे असे म्हणता येईल की, शेकडा 90% प्रमाण केंद्रासाठी ग्रामपंचायत कार्यालयाचा वापर हा केला जातो·

19) प्रौढ शिक्षणाधिकारी यांची मुलाखत घेतली त्यावेळी असे दिसून आले की, त्यांनी उस्मानाबाद जिल्हयात स्तुत्य उपक्रम केला आहे· परांडा आणि भुम तालूका 100% साक्षर करण्याचे ध्येय ठेवले· परांडा आणि भूम तालुक्याकडे लक्ष केंद्रीत केले· परांडा तालुका 100% साक्षर झाला आहे· उस्मानाबाद तालुक्याकडे त्यांनी दूर्लक्ष केले नाही· साक्षरता जास्तीत जास्त करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे· उस्मानाबाद तालुक्यातील केंद्रावर " सौर उर्जा"आणि शिलाई काम इत्यादी उपक्रम राबविले आहे·

**20) पर्यवेक्षण कामासाठी मिळणारे वेतन पुरेसे नाही :-**

4·3:11 कोष्टकाद्वारे असा निष्कर्ष निघतो की, पर्यवेक्षण कामासाठी मिळणारे वेतन हे पुरेसे नाही, असे म्हणणा-यांचे शेकडा प्रमाण 60% आहे· मिळणारे वेतन पुरेसे आहे असे म्हणणारे शेकडा 40% आहे· म्हणून असे म्हणावे लागते की, प्रौढ शिक्षण कार्यक्रमासाठी मिळणारे वेतन समाधान कारक नाही·

xxxxx

## शिफारशी - सुचना

1) साक्षरता हे सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन आहे. साक्षरतेचे कार्यक्रम या संदर्भातच अंमलात आणले पाहिजेत.

2) या कार्यक्रमाचा प्रचार प्रमुखतः गरीब, शोषित, मागासवर्ग व स्त्रिया यांच्यात झाला पाहिजे. कारण निरक्षरांची बहुसंख्या याच वर्गात आहे.

3) प्रत्येक गरीब व शोषित व्यक्तिचा आत्मविश्वास जागृत करुन तिला स्वयंप्रेरणेने आर्थिक व सामाजिक विकासासाठी तयार करणे.

4) प्रौढ शिक्षणाव्दारे व्यक्तीला आपल्या अडचणींचे खरे स्वरुप समजले पाहिजे आणि त्या नाहीशा करण्याकरता बुध्दिपुरस्सर कृती करणारी संघटना बांधण्यात त्यांना सहभागी होता आले पाहिजे.

5) प्रौढ शिक्षण मोहिमेत शासन स्वयंसेवी संस्था आणि विद्यापीठ या तीन स्तरांवर कार्य चालते परंतु या सर्वांच्या कामामध्ये समन्वय असणे जरुरीचे आहे.

6) प्रौढ शिक्षण कार्यक्रमात संघटक हा एक महत्वाचा घटक आहे. त्याचे प्रशिक्षण परिणामकारक रीतीने कसे होईल याकडे लक्ष देणे जरुरीचे आहे.

7) उस्मानाबाद तालुक्यात कृषी हा महत्वाचा व्यवसाय असल्यामुळे शेती संबंधित अशा व्यवसायाबद्दल योग्य ती कौशल्ये शिकविणे जरुरीचे वाटते.

8) प्रौढ शिक्षण केंद्रातून दिले जाणारे शिक्षण हे स्थानिक गरजांवर आधारित असले पाहिजे.

9) प्रौढ शिक्षण कार्यक्रमात स्थानिक लोकांचा सहभाग कसा वाढेल याचा प्रयत्न स्वयंसेवी संस्था आणि शासन यांनी केला पाहिजे.

10) प्रौढांना आकर्षित करण्याचे दृष्टीने सांस्कृतिक कार्यक्रम आणि आरोग्यविषयक कार्यक्रम अधिक प्रमाणात घेतले पाहिजेत.

11) प्रौढांना उत्साह वाढवा या दृष्टीने ज्या प्रौढांना या कार्यक्रमात यश मिळते त्यांना बक्षिसे दिली जावीत. तसेच शासकीय योजनेतील कर्ज वाटप करताना प्रौढ शिक्षणात भाग घेणा-यांना प्राधान्य देण्यात यावे.

12) प्रौढ शिक्षण कार्यक्रमात विकास कार्याशी संबंधित अशा खात्यांचे सहकार्य मिळणे आवश्यक आहे.

13) उस्मानाबाद तालुक्यात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे या विभागात स्त्रियांसाठी अधिक केंद्रे उघडणे जरुरीचे राहिल.

14) प्रत्येक महाविद्यालयाने प्रायोगिक पातळीवर एक अथवा दोन प्रौढ शिक्षण केंद्रे चालविणे आणि केंद्रसंघटन आणि व्यवस्थापनात काय अडचणी येतात त्यांचा अभ्यास करणे.

15) महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी प्रौढ शिक्षण उद्बोधन वर्ग चालवून भोवतालच्या संघटकांच्या प्रशिक्षणात सक्रिय भाग घेणे.

16) एका महाविद्यालयीन किंवा शालेय विद्यार्थाने एक प्रौढ साक्षर करावा 1:1 असे प्रमाण असावे. सुशिक्षित, बेकार तरुणांचा सहभाग प्रौढ-शिक्षण कार्यक्रमात असावा.

17) स्त्री साक्षरता कार्यक्रम आखताना काळजीपूर्वक, संवेदनक्षम व अर्थपूर्ण शैक्षणिक दृष्टीकोनाची गरज असूनशिक्षणाची सांगड भिन्न भिन्न विकास कार्यक्रमाशी घालणे गरजेचे आहे.

18) कुटुंब कल्याण चळवळ व इतर विकास कार्यक्रम त्या, त्या खात्याव्यतिरिक्त इतरांचेही सहकार्य घेवून संपूर्ण स्त्री समाज राष्ट्रीय प्रवाहात कसा येईल याचे प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे.

19) प्रौढ शिक्षणातील सर्व घटकांनी समूह संपर्क साधनाव्दारे समाजातील हुंडा व हुंडाबळी अशा दुष्ट प्रवृत्तींच्या विरोधीसमाज प्रबोधन करणे अत्यावश्यक आहे.

20) स्त्रीयांच्या विकास कार्यक्रमात शासकीय व स्वयंसेवी संघटना यांनी एकत्र येवून जनतेस प्रेरणा देवून त्यांचा सहभाग मिळविण्याचा प्रयत्न करणे.

*****

## 5·2 पुढील संशोधनाचे विषय :-

अभ्यासकाने "उस्मानाबाद तालुक्यातील प्रौढ शिक्षण समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास केला· प्रकरण 5·1 मध्ये अभ्यासकाने आपले निष्कर्ष काढलेले आहेत· तरीही या विषयाच्या अनुरोधाने सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता अभ्यासकाला वाटते· त्या दृष्टीने पुढील संशोधनाचे विषय देत आहे·

1) प्रौढ शिक्षणामुळे मागासवर्गीयात झालेल्या सुधारणाच्या कारणांचा अभ्यास·

2) स्त्री - पुरूष मिश्र प्रौढ शिक्षण केंद्राचा चिकित्सक अभ्यास·

3) निरक्षरतेची समस्या ही केवळ एखादया देशाची समस्या नसून एक जागतीक समस्या आहे· याचा तौलनिक अभ्यास·

4) साक्षरतेच्या कार्यात स्त्रीयांचा आणि तरूणांचा सहभाग एक अभ्यास·

5) प्रौढ शिक्षणामुळे ग्रामिण भागात झालेले बदलात्मक अभ्यास·

6) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम आणि शिक्षण संस्था यांचा चिकित्सक अभ्यास·

7) प्रौढ शिक्षणासाठी प्रारंभिक पुस्तक तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्वांचा एक अभ्यास·

8) स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षण कार्यक्रमांचा चिकित्सक अभ्यास·

9) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या प्रकिया व अभ्यासकमाचा तुलनात्मक अभ्यास·

10) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचा अभ्यास करून त्यात सुधारणा किंवा बदल करण्यासाठी मार्ग व उपायांचाचिकित्सकअभ्यास करणे·

11) प्रौढ शिक्षणांच्या संदर्भात महाराष्ट्रातील विद्यापीठानी केलेल्या कार्याचा आढावा घेणे·

12) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या यशस्वीते साठी समुह संपर्क साधनांचा कितपत परिणाम कारक रित्या वापरता येता यांचा शोध घेणे·

13) अनौपचारीक शिक्षण व शेतक-यांचे प्रशिक्षण यावर परिणाम करणा-या घटकांचा शोध घेणे·

14) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम अमंलबजावणीतील कच्चे व पक्के दुवे शोधणे·

15) प्रौढ शिक्षण केंद्रांच्या कार्याचे वर्तन व संघटन संदर्भात मुल्यमापन करणे·

16) प्रौढ व त्याचा प्रशिक्षक यांच्या पार्श्वभुमीचे विश्लेषण करणे·

17) प्रौढ शिक्षण केंद्राच्या कामकाजाचे नेप N.A.P.E. च्या संबंधाने परीक्षण करणे·

18) प्रौढ शिक्षण केंद्राच्या कार्यातील कच्चे व पक्के दुवे ओळखून यास जबाबदार घटकात सुधारणा घडवून आणण्यासाठी कृती कार्यक्रम सुचविणे·

xxxxxxxxxx